'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Global Impact Factor – 0.565 (2014) & 0.676 (2015) Vol. 2 Issue. 4
ISSN :2348-7143 (Online)
Oct. - Dec.- 2015

# संत एकनाथकृत हरिपाठातील मानवतावाद

**डॉ. म. सु. पगारे**
प्रोफेसर व मराठी विभाग प्रमुख,
संचालक, भाषा अभ्यास प्रशाळा,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव,

**प्रा. धनराज तोताराम धनगर**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,
मालेगाव, जि. नाशिक.

संत एकनाथांचे साहित्य हे माणसाला अध्यात्मिक अर्थाने मुक्ती मिळावी, मोक्ष मिळावा या हेतुने आलेले आढळते. तथापि, मोक्ष, मुक्ती या काल्पनिक संकल्पना जरी असल्या तरी मोक्ष मुक्तीपर्यंत जाण्यासाठी त्यांनी सुचविलेल्या मार्गांचे स्पष्टीकरण करण्यासाठी त्यांनी काही वास्तवातील उदाहरणे प्रतिमा, प्रतिके यांचा वापर केलेला आढळतो. समाजातील व्यंगावरती टीका केलेली आढळते. यातून समाजाचे उद्बोधन, प्रबोधन होऊन समाज काही प्रमाणात का होईना परंतु वास्तववादी विचार करण्यास प्रवृत्त होईल अशा प्रकारच्या रचना आढळतात. ज्ञान, विज्ञान विवेक, स्वातंत्र्य, समता, सहिष्णूता, सहकार्य, सत्संगती, दातृत्व, संयम, नैतिक आचरण, प्रेम, मनुष्य जन्माचे महत्त्व, मानवी मनाचे वास्तववादी चित्रण, षड्रिपूंवर विजय मिळविण्यासंदर्भातील व विषयवासनांचा त्याग करण्यासंदर्भातील उद्बोधन, ध्येयप्राप्ती, मानवी जीवनाच्या विविधावस्था यांचे वास्तववादी चित्रण व त्यांच्या साहित्यातून माणसाला माणूस म्हणून संस्कारित करणाऱ्या, बुद्धिवादी, विवेकी, वास्तववादी आणि विज्ञानवादी जाणीवा याचा शोध त्यांच्या साहित्यातील मानवतावादाला अधोरेखित करणारा ठरतो. संत एकनाथांच्या हरिपाठाच्या अभंगात अशा स्वारूपाच्या मानवतावादाला अधोरेखित करणाऱ्या जाणीवा आढळतात काय? याचा शोध घेणे उद्बोधक टरणारे आहे.

मानवतावादाच्या अनुषंगाने मानवेंद्रनाथ रॉय, ख्रिस्तोफर डॉसन, जॉन रालस्टन सौल, डॉ. व्ही. एम. तारकुंडे आदि विचारवंतांनी 'मानवतावादाच्या कसोट्या' आपल्या तत्त्वज्ञानातून, लिखाणातून स्पष्ट केलेल्या आढळतात. डॉ. व्ही. एम. तारकुंडे म्हणतात, "मानवतावाद हे मानवी स्वातंत्र्याचे तत्त्वज्ञान आहे. त्याचे मूलभूत तत्त्व जर कोणते असेल तर हा मानव हा सर्व अस्तित्वाचा मानदंड आहे, हे होय. एखाद्या श्रेष्ठतर साध्याचे ते साधन खास नव्हे. मानवतावादाचा आग्रह असा आहे की, मानव हाच त्याच्या भवितव्याचा शिल्पकार होय. त्याला कोणत्याही आधिदैविक शक्तीच्या नियंत्रणाखाली जसे राहण्याचे कारण नाही, त्याचप्रमाणे दैवी प्रेरणेनेही त्याचे भवितव्य ठरत नसते. मानवतावादाचा आग्रह असाही आहे की, मानवी जीवन हेच अंतिम उद्दिष्ट मानल्यामूळे त्याला एखाद्या काल्पनिक समूहात्मक अस्मितेत (उदाहरणार्थ, राष्ट्र, जाती वा वर्ग) स्वत:ला समाविष्ट करून घेण्याची वा त्यासाठी स्वत:चे बलिदान करणाची आवश्यकता नाही. तथापि स्वातंत्र्य हे व्यक्तीला समाजात उपभोगावयाचे असल्यामुळे स्वतंत्र व्यक्ती ही एक स्वयंपूर्ण नैतिक शक्ती असणे आवश्यक आहे. व्यक्तीला स्वच्छेने नैतिक आचरण ठेवणे शक्य होणार नसेल तर तो आपले स्वतंत्र व्यक्तित्व टिकवू शकणार नाही कारण त्या अवस्थेत आवश्यक त्या आदर्शांशी सुसंवादी असे त्याचे जीवन व्हावे म्हणून समाजाला त्याच्यावर दडपण आणणे भाग पडेल. प्राणिमात्राच्या लक्षावधी वर्षांच्या उत्क्रांतीचे मानवतावादाला जे दर्शन घडले आहे त्यावरून मानवाच्या नैतिक प्रेरणा, त्याचप्रमाणे त्याची तर्कशुद्धता यांचा स्रोत कोणता आहे याचे मानवतावादाला ज्ञान झालेले आहे. त्या दोघांच्या संयोगामुळे मानवी व्यक्तीत्व हे स्वयंपूर्ण नैतिक शक्तीत विकसीत होणे शक्य झाले आहे."[१] डॉ. व्ही. एम. तारकुंडे यांच्या मानवतावादाच्या अनुषंगाने आलेल्या या विवेचनाचा संत साहित्याच्या संदर्भात विचार करता संत साहित्यातून आधिदैविक शक्तींचेच प्राबल्य अनेक ठिकाणी जाणवते तथापि राष्ट्र, जाती वा वर्ग अशी समुहात्मक अस्मिता झूगारून देऊन मानवकेंद्री वैश्विकतेचा विचार संत

साहित्यातून आलेला दिसतो आणि स्वयंपूर्ण नैतिक शक्ती माणसामध्ये विकसीत व्हावी या दृष्टीने संस्कार रूजविणारे विचार देखील प्रकट झालेले दिसतात.

डॉ. मानवेंद्र नाथ रॉय यांनी मानवतावादा संबंधी -

१. "Man is the archetype of society
२. Man is the measure of everything. The development of individual is the measure of social progress.
३. The supreme importance of man results from the fact that in him the physical process of becoming has reached the highest pitch so far. Humanism thus ceases to be a mystic and poetic view of life. Harmonized with humanism, materialist philosophy can have an ethics whose values require no other sanction than man's innate rationality."[२] असे म्हटले आहे.

अशाप्रकारे माणसाला केंद्रवर्ती ठेवून आणि त्याला supreme importance देऊन संत एकनाथांच्या हरिपाठाच्या अभंगांचा मानवतावादाच्या परिप्रेक्षात अभ्यास करता येणे शक्य वाटतो .

संत ज्ञानेश्वरांप्रमाणेच संत एकनाथांनीदेखील हरिपाठाची रचना केलेली आढळते. संत एकनाथांच्या नावावर २८ हरिपाठाचे अभंग आढळतात. संत एकनाथांच्या हरिपाठामधून नामभक्तीचाच पुरस्कार केलेला दिसतो. हरिचे अस्तित्व मात्र प्रत्यक्षात आढळत नाही त्यामुळे हरीच्या नामभक्तीतून एकनाथांना अपेक्षित असणारी फलनिष्पतीदेखील काल्पनिक स्वरूपाचीच- 'पूनर्जन्म न मिळण्यासंदर्भातील' अपेक्षित असलेली दिसते. संत एकनाथांनी पूनर्जन्म ही संकल्पना मान्य केलेली आढळते. जन्मघेण्यात दु:ख आहे असा समज त्यातून व्यक्त होतांना दिसतो. "हरिमूखे गाता हरपली चिंता। त्या नाही मागुता जन्म घेणे ।।"[३] असं ते म्हणतात. मुळात पूनर्जन्म ही संकल्पना वैज्ञानिक दृष्ट्या सिद्ध झालेली नाही. तो केवळ एक काल्पनिक समज ठरतो त्यामूळे अशा स्वरूपाचे येणारे चित्रण हे मानवसमूहाची दिशाभूल करणारेच ठरते. हरिपाठातून मानवाला संस्कारित करणाऱ्या व माणसाच्या वास्तव जीवनात मार्गदर्शन करणाऱ्या ओव्या तेवढयाच फक्त मानवतावादाशी संवादी म्हणता येतील. हरीपाठाच्या दुसऱ्या अभंगात-

"नको नको मान नको अभिमान । सोडी मी तूं पण तोचि सुखी ।।
सुखी जेणें व्हावें जग निववावें । अज्ञानी लावावे सन्मार्गासीं ।।" [४]

माणूस हा समाजशील प्राणी आहे. तो समाजात राहतो, वाढतो, मोठा होतो. समाजाशिवाय माणसाचे अस्तित्व माणूस म्हणून असूच शकत नाही. अशा या समाजात जी माणसे अभिमानाने वागतात, अहंकाराने वागतात ती समाज-समुहापासून दूर जातात. आपल्याच अहंकारात वागणाऱ्या माणसांना हा समाज थारा देत नाही. 'असशील तू कितीही ज्ञानी-तुझ्या घरी ! तुझ्या ज्ञानाचा, श्रीमंतीचा, तुझ्या सुखाचा आम्हाला जर काही फायदा होणार नसेल तर तुला आम्ही का म्हणून मान द्यावा ।' असा प्रश्न समाजातून विचारला जातो. अशावेळी पैसा, बळ, ज्ञान, सुख-समृद्धी धारण करणारा हा माणूस माणसे दुरावल्याने एकाकी पडतो आणि एकाकीपणाचे दु:खच तेवढे त्याच्या वाट्याला येते. स्वत: सुखी होऊन जगाकडे पाठ फिरविणाऱ्या माणसांची या जगात किंमत केली जात नाही. त्यामूळेच माणसाने कोणत्याही प्रकारचा मान-अभिमान यात न अडकता, मी-तू पण सोडून समाजकार्यात स्वत:ला वाहून घेणे यातच खरेतर मानवी जीवनाचे सार्थक असते. आपल्या ज्ञानाचा, धनाचा उपयोग इतरांनाही व्हावा व आपल्याला मिळालेले सुख इतरांनाही मिळावे असा विचार करणारीच माणसे या जगात त्यांच्या कार्याने मृत्यूनंतरही ओळखली जातात. उपरोक्त अभंगातून संत एकनाथांनी केलेला हा मी-तू पण सोडण्याचा उपदेश, मान-अपमान-अभिमान यात न अडकण्यासंदर्भातील उपदेश हा त्यामुळेच माणसाच्या सुखाची अपेक्षा करणारा असल्याचे म्हणता येते. माणसाने स्वत: सुखी व्हावे आणि जगालाही सुखी करावे हा विचार,

'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Global Impact Factor – 0.565 (2014) & 0.676 (2015) Vol. 2 Issue. 4
ISSN :2348-7143 (Online)
Oct. - Dec.- 2015

जे अज्ञानी आहेत त्यांना ज्ञानाचा मार्ग दाखवावा हा विचार मानवी समाज धारणेच्या उद्दिष्ट्यांप्रत घेऊन जाणारा असाच म्हणावा लागेल. स्वस्थ समाजसमुहाची जोडणी होण्याची अपेक्षा त्यातून व्यक्त होत असल्याने येथे मानवतावादी केंद्रांचा आढळ असल्याचे म्हणता येते.

कर्माचे महत्त्व संत एकनाथ मान्य करतात. जे जे कर्म केले जाते त्यानूसार त्याचे फळ मिळते हा भाग वास्तवाला धरून ठरतो. संत एकनाथ म्हणतात. "केले कर्म झाले तेचि भोगा आले।"[५] यातून कर्मानूसार फळ प्राप्ती हा भाग आलेला दिसतो. हा विचार देखिल विवेकाला वास्तवाला अनुसरून आहे कार्यप्रधानत्व त्यात आहे. 'जशी कृती कराल तसेच फळ मिळेल'. आम्रवृक्षाची लागवड केली तर आंबे मिळतील आणि बाभळीचे बी पेरले तर काटेच हाती येतील. माणसाच्या जीवनात येणात्या सुख-दु:खाच्या मागील कार्यकारणमीमांसा यात दिसते. माणसाचे जीवन हे काही पूर्व नियोजित बाब असू शकत नाही तरीदेखील ज्योतिषशास्त्राचे नाव घेऊन काही लोक मात्र माणसांचे शोषण करतात. जीवनात यश प्राप्तीसाठी, धन प्राप्तीसाठी निरनिराळेच कर्मकांड करण्याचा आग्रह धरतात. यातून माणसांचे शोषण होते. माणसांची दिशाभूल करून स्वत:चा स्वार्थ साधण्याची संधी यामुळे अशा संधीसाधुंना प्राप्त होते. मात्र 'तुमच्या जीवनात आज तुम्ही जी कृती कराल तिची फळे नजिकच्या भविष्य काळात तुम्हाला चाखायला मिळतील' असा विज्ञानवादी, वास्तव आणि विवेकी उपदेश संत एकनाथ येथे करतात. यातून माणसाने विज्ञानाची कास धरावी. समाजोपयोगी आणि समाजमान्य अशी चांगलीच कृती करावी अशीही अपेक्षा येथे व्यक्त होतांना आढळते. माणसाकडून सद्वर्तनाची अपेक्षा करणारे, त्याला कर्मकांड व कल्पनेपासून परावृत्त करणारे अशा स्वरूपाचे अभंग मानवी कल्याणाची केंद्रे प्रसारित करणारे असल्यामुळे मानवतावादी म्हणता येतील.

"काम क्रांध लोभ जयांचे अंतरी । नाही अधिकारी ऐसा येथ ।।"[६] या हरीपाठाच्या ओळींतून भक्तीच्या क्षेत्रामध्ये काम, क्रोध, लोभ अंगी असणाऱ्यांना अधिकार नाही. या संदर्भातील वर्णन आलेले आढळते. काम, क्रोध, लोभ हे मानवी जीवन विकासातील अडथळेच ठरतात. त्यामूळे त्यांचा त्याग करणे ही बाब वास्तवातील मानवी जीवनाला संस्कारीत करणारी बाब म्हणाावी लागेल. काम, क्रोध, लोभ यांच्या आहारी जाऊन जे पुरूष आपल्या कर्तव्यांपासून दूर होतात त्यांचे कर्तव्यविन्मुख होणे हे त्यांच्या प्रगतीस हानिकारकच ठरते. अशी माणसे केवळ स्वार्थी वर्तन करतात. त्यामुळे भक्तीच्या क्षेत्रात अशा संधीसाधू लोभी माणसांना काहीही स्थान नाही असे संत एकनाथ म्हणतात. भक्ती हे समाजोध्दाराचे साधन फक्त आहे. परोपकार, समाजसेवा त्यातून साध्य करावयाची असते. मात्र लोभी, स्वार्थी माणसे अगदी उलट वर्तन करणारे असल्याने त्यांची भक्ती केवळ स्वार्थी बुध्दीनेच केलेली असल्याने फलद्रुप होऊ शकत नाही. नाथांचे हे उद्बोधन नैतिकतेचा संस्कार रुजविणारे, विवेकी विचार रुजवू पाहणारे, माणसाच्या वास्तव जीवनप्रवासात संयम आणि संस्कारांचे महत्त्व अधोरेखित करणारे असेच आहे. त्यामुळे येथे मानवतावादी विचारकेंद्रे आढळतात असे म्हणता येते.

सत्संगतीविषयी मार्गदर्शन करतांना संत एकनाथ "स्वहीताकारणे संगती साधूची।"[७] आणि "खळांची संगती उपयोगासी न ये।आपणा अपाय त्याचे संगे।।"[८] अशा स्वरूपाचा उपदेश करतात. येथे साधू म्हणजे कर्मकांड करणारा, अंगाला राख लावणारा, बाह्य वेषधारी अशा प्रकारचा साधू अपेक्षित नाही तर समाजामध्ये सत्कर्म करणारा, प्रेमाने, न्यायाने वागणारा, परोपकार करणारा, दीन, दरीद्री, दु:खी जनांना मदत करणारा, रंजल्या-गांजलेल्यांसाठी धावून जाणारा असा सज्जन माणूस अपेक्षित आहे. अशा सद्वर्तनी माणसाच्या सहवासात आल्यावर दु:खी, दरिद्री, दीन, दलित, शोषित माणसांचे दु:ख हलके होणार आहे. अशा साधू-सज्जनांच्या सहकार्यातून माणसाला सत्कार्याची प्रेरणा मिळते, त्यातून समाज-समूहाचे हित साधले जाते. याऊलट वाईट माणसाच्या संगतीने चांगला माणूस देखील वाईट गोष्टींमध्ये अडकू शकतो. दूर्वर्तनी माणसाच्या संगतीमूळे समाज त्याच्या सोबतच्या माणसांना देखील दूर्वर्तनी म्हणूनच पाहतो. दूर्वर्तनी माणसासोबतच त्याच्या मित्रांची, त्याच्याशी संबंधित असणाऱ्या सर्वांचीच निंदा हा समाज करतो. चांगल्या

गुणांऐवजी वाईट गुणांकडे आकर्षित होण्याची शक्यता अधिक असते. मानवी मन चंचल असल्यामूळे सत्प्रवृत्तीपेक्षा दूष्प्रवृत्ती माणसांवर लवकर आरूढ होण्यात यशस्वी होतांना दिसतात. त्यामूळे चांगल्या माणसाच्या सोबतीत असणारा वाईट माणूस हा चांगला होण्याऐवजी चागल्या माणसाचे वाईट माणसात परिवर्तन होण्याची शक्यता अधिक असते अशा प्रकारचे वास्तव जीवनानुभव आपणास पदोपदी अनुभवता येतात. उपरोक्त अभंगामधून अशाच वास्तव जीवणानुभवांचे सार प्रकट होतांना दिसते. त्यातून माणूस संस्कारित व्हावा, वाईट माणसाच्या संगतीत जाऊन अहित होण्याऐवजी चांगल्या माणसाच्या संगतीत जाऊन माणसानं आपले स्वहीत साधावे अशा प्रकारचा मौलिक विचार व्यक्त होतांना दिसतो. सत्संगाच्या अनुषंगाने समाज सुदृढ होण्याच्या दृष्टीने नवीन नातेसंबंध प्रस्थपित करतांना समाजातील सुदृढ घटकांनी दुर्बल घटकांशी संबंध जोडावेत जेणे करून दुर्बल देखील सुदृढ होतील असा विचार संत एकनाथ व्यक्त करतात.

"दुर्बलाची कन्या समर्थाने केली । अवदशा निमाली दारिद्र्याची"[९]

अशाप्रकारे सामर्थ्यवानाने दुर्बलाशी नातेसंबंध जोडणे, श्रीमंतांने गरीबाशी नातेसंबंध जोडणे, उच्चवर्णियांनी कनिष्ठ वर्णियांशी नाते प्रस्थापित करणे, आंतर जातीय नाते प्रस्थापित करणे, आंतरधर्मिय नाते प्रस्थापित करणे यातून समाजातील भेदाभेद नाहीसा होईल अशा स्वरूपाचा क्रांतिकारी विचार हा समाज-समुहाला जोडणारा व एकात्म समाजबांधणीसाठी मार्गदर्शन करणारा ठरतो.

थोडक्यात एकनाथांच्या हरिपाठातून येणारे कल्पनेतल्या हरिसंदर्भातील नामभक्तीचा पुरस्कार करणारे, मोक्ष, पूनर्जन्मादि संकल्पनेचा पुरस्कार करणारे वर्णन वगळून माणसाच्या जीवनप्रवासासाठीच्या संस्कारांचे वर्णन तेवढे मानवतावादाशी संवादी म्हणता येते. काम क्रोध अहंकार या विषयीचे उद्बोधन, कर्माप्रमाणे फळ मिळते असे म्हणण्यातून व्यक्त झालेली सत्कर्माची अपेक्षा, सत्संगाचे महत्त्व आणि एकात्म अशा मानव-समाजबांधणीसाठी व्यक्त झालेले विजातीय विवाहाचा पुरस्कार करणारे विचार यातून समाजस्वास्थ्यवर्धक विवेकी विचारांचा आढळ असल्याने त्याचा संबंध मानवतावादाशी जोडता येऊ शकेल.

**संदर्भ सूची :-**

१. डॉ. व्ही. एम. तारकुंडे (अनुवाद -द्वा. भ. कर्णिक) - मुलगामी मानवतावाद, पृ. क्र. १, श्रीविद्या प्रकाशन पुणे, प्र. आ. १९८५
२. http://irhayouthforum.org/M_N_ROY.html
३. पां. आ. घुले - श्री एकनाथ महाराजकृत वाङ्मयअष्टक, (संत एकनाथ महाराजकृत हरिपाठ), श्री संत तुकाराम महाराज वाङ्मय प्रकाशन संस्था, आळंदी, प्र. आ. १९९८, पृ. क्र. २८८
४. तत्रैव - पृ. क्र. २८८
५. तत्रैव - पृ. क्र. २८८
६. तत्रैव - पृ. क्र. २९१
७. तत्रैव - पृ. क्र. २९०
८. तत्रैव - पृ. क्र. २९२
९. तत्रैव - पृ. क्र. २९३